# खपमती



रा. अ. काळेले

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १६५८
१६५८
REFBK-0014064
REFBK-0014064

૩૭૯૫૭
કાવ્ય.
૩।૩।૯૫
સં. શા.
૧૯૫૨

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३८८५७ वि: काव्य
क्रमांक १६५७ नों दि. ३-३-५५
दा. क. १४५०८
REFBK-0014064
REFBK-0014064

# रूपमती

## कविता-संग्रह

रा. अ. काळेले

कॉंटिनेंटल प्रकाशन

कॉंटिनेंटल प्रकाशन – पुणें

पुनर्मुद्रणाचे हक्क प्रकाशकाकडे
इतर सर्व हक्क : कवीकडे
प्रथमावृत्ती : १५ ऑगस्ट १९६४
किंमत : दोन रुपये पन्नास पैसे
प्रकाशक : अ. अं. कुलकर्णी, कॉन्टिनेंटल प्रकाशन, टिळक रोड, पुणें २.
मुद्रक : वि. नी. पटवर्धन, साधना प्रेस, ४३०-३१ शनिवार पेठ, पुणें २.

माझ्या काव्याचे पहिले आणि हौशी प्रकाशक,

माझे मेहुणे,

श्री. त्रिं. अ. तथा बाळासाहेब माईणकर

यांस सप्रेम

## आभार

गेल्या दहाबारा वर्षांतल्या या माझ्या चाळीसएक कविता. त्या हाताशी आल्या तशा मी कॉंटिनेंटल् प्रकाशकांच्या स्वाधीन केल्या. त्यांचे प्रकाशन आवडीने स्वीकारून अल्पावधीत पूर्ण केल्याबद्दल श्री. अनंतराव कुलकर्णी यांचा मी अत्यंत आभारी आहे.

श्री. भाऊसाहेब खांडेकर यांनी या पुस्तकाला प्रस्तावना दिली. लेखनाचा बोजा हातावर असता, आणि प्रकृती बरी नसता ही तसदी त्यांनी माझ्याखातर घेतली यासाठी त्यांचा मी ऋणी आहे.

'प्रतिभा', २९ पंतवैद्य कॉलनी,
इंदूर.

रा. अ. काळेले

# दोन शब्द

इंदूरचे प्रसिद्ध कवि श्री. रा. अ. काळेले यांचा 'रूपमती' हा काव्य-संग्रह रुग्णशय्येवर पडल्यापडल्या मी चाळूं लागलों. 'वाट तूझी पैंजणाची' ही पहिली कविता वाचतां वाचतांच माझें मन तीस वर्षांपूर्वींच्या काळांत गेलें. 'तुज म्हणूं कुणासारखी ?' हा काव्यचरण कानाशीं गुंजारव करूं लागला. १९३५ सालीं पुण्याला भरलेल्या 'शारदोपासक संमेलनां'त श्री. काळेले यांनीं थोडीशी संस्कृत वळणाची, पण भावमधुर अशी ही आपली कविता म्हणून दाखविली असावी. त्यापूर्वींच्या दशकांत यशवंत आणि माधव ज्यूलियन यांच्या कवितांनीं रसिकांचीं मनें कशीं मोहरून गेलीं होतीं. तशींच तांब्यांच्या प्रौढ प्रतिभेला आलेल्या दुसऱ्या बहरानेंहि ती सुगंधित झाली होती. याच काळांत काळेले काव्यक्षितिजावर चमकूं लागले. तांब्यांच्या काव्यात्म जीवनाचे आणि गीतगुणांनीं समृद्ध असलेल्या कवितेचे संस्कार काळेल्यांच्या कवितेवर झाले आहेत, हें रसिकांना जाणवलें. मात्र त्याबरोबरच अभिजात संस्कृत काव्यांचा व्यासंग, मालोभूमीच्या निसर्ग-सौंदर्याचें अजोड आकर्षण आणि कवितेच्या गेयतेकडे असलेली उत्कट ओढ हे त्यांचे विशेषहि सर्वांच्या डोळ्यांत आणि कानांत भरले.

'तुज म्हणूं कुणासारखी ?' ही कविता काळेले यांच्या तोंडून मी ऐकल्याला आतां अडीच तपें होत आलीं. तीस उन्हाळे आले आणि गेले; पण त्यांची काव्यसरिता पूर्वींच्याच प्रसन्नतेनें पण अधिक प्रगाढतेनें आजहि मार्गक्रमण करीत आहे. कित्येक कवींची प्रतिभा विजेसारखी असते. तिची चमक डोळे दिपविते. पण चमकतां चमकतांच ती वीज डोळे दिपवून लुप्त होते. अत्रे-काणेकर हे या जातीचे कवि. पण कित्येकांची काव्यशक्ति शुक्राच्या चांदणीसारखी शांतपणें आणि स्निग्धपणें अखंड तेवत राहते. काळेले या दुसऱ्या वर्गांतले कवि आहेत. रसग्रहणात्मक किंवा विवेचनात्मक टीकालेखन त्यांनीं केलेलें नाहीं असें नाहीं. पण तेंसुद्धां मुख्यतः काव्याशींच संलग्न आहे. आपल्या तीन तपांच्या अविरत काव्यसाधनेंत त्यांनीं विपुल आणि विविध

कविता लिहिली. अनेक प्रयोग केले. तांबे-माधव ज्यूलियन यांच्या काळापासून—आरती प्रभु-दिलीप चित्रे यांच्या काळापर्यंत आधुनिक मराठी कवितेच्चीं जीं स्थित्यंतरें झालीं तीं त्यांनीं डोळसपणें न्याहाळलीं. नव्यांतलें जें जें त्यांच्या सौंदर्यलुब्ध व प्रयोगशील वृत्तीला आवडलें तें तें त्यांनीं आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. झपाट्यानें बदलणाऱ्या काळाबरोबर त्यांचे काव्यविषय बदलले आहेत. आविष्कार-पद्धतीनें निराळीं रूपें धारण केलीं आहेत. असें असूनहि त्यांच्यांतला नादलुब्ध आणि सौंदर्योपासक कवि तीस वर्षांपूर्वीइतकाच संवेदनाक्षम आहे. 'रूपमती' हा त्यांचा संग्रह वाचतांना या कवीनें प्रौढत्वांतहि यौवनाची किती कसोशीनें जपणूक केली आहे याची चांगली जाणीव होते. मात्र राहून राहून मला एक गोष्टीचें आश्चर्य वाटतें. सारा जन्म पोलीसखात्यांत अधिकाराच्या आणि दगदगीच्या जागीं घालवून आपल्या काव्यशक्तीचा टवटवीतपणा त्यांना कसा राखतां आला, हें एक कोडें आहे. हें काव्यरहस्य त्यांनीं रसिकांना एकदां सविस्तर सांगावें, अशी माझी त्यांना विनंति आहे. साहित्यांत व्यावसायिक गुपितें (Trade Secrets) नसतात असें नाहीं. पण चित्रपट, नाटक, हुकमेहुकूम कथा वगैरे लेखनाशीं त्यांचा अधिक संबंध असतो. काव्यांत अशीं गुपितें फार कमी असावींत, असा माझा कयास आहे. म्हणूनच श्री. काळेले यांना ही विनंति मी करीत आहें.

'रुपमती' या संग्रहांत काळेल्यांच्या काव्यशक्तीचें प्रगल्भ रूप चांगल्या रीतीनें प्रतिबिंबित झालें आहे. निसर्गाच्या आणि प्रीतीच्या विविध रूपांत रमण्यांत त्यांना असाधारण आनंद वाटतो. या संग्रहांतल्या अनेक कवितांचीं नुसतीं शीर्षकें वाचलीं तरी कामरूपिणी सृष्टीचीं आपल्या प्रतिभेच्या कुंचल्यानें त्यांनीं किती भिन्नभिन्न प्रकारचीं चित्रें काढलीं आहेत, याची कल्पना येईल. बानगी म्हणून पृ. ४३ वरील 'पिवळें' ही कविता पहावी. कवीनें वर्णन केलें आहे तें प्रसन्न मुद्रेनें घरींदारीं प्रवेश करणाऱ्या सकाळच्या कोंवळ्या सोनेरी उन्हाचें; पण या उन्हाचें पिंवळेपण काळेल्यांच्या काव्यस्पर्शानें एखाद्या

स्वर्गीय फुलपांखरासारखें होऊन गेलें आहे. अतिपरिचयामुळें सृष्टींतलीं असंख्य सौंदर्यें आपण शून्य दृष्टीनें पाहतों. पण या सौंदर्यांत हृदयाच्या नाजूक तारा कंपित करण्याची केवढी शक्ति असते, हें ही कविता वाचल्यावर आपल्या लक्षांत येतें. या कवितेंतल्या

> ही गीताची लकेर पिवळी
> पानांच्या कानीं का पडली
> हळुच पायरीवरी कुणाचीं
> सोनपावलें पिवळीं चढलीं

या ओळींतली चित्रणाची शक्ति काळेल्यांच्या सर्व निसर्गविषयक कवितांत आढळते. विविध भाववृत्तींनीं धुंद होऊन ते जेव्हां निसर्गचित्रण करतात तेव्हां या शक्तीचें विकसित स्वरूप दृष्टीला पडतें. 'रात्र झाली कीं' 'अपरात्रींच्या जांभईमधें' आणि 'असें झालें आहे कांहीं' या तीन कवितांतली रात्र किती निराळी आहे. 'रूपमतीं'त भिन्नभिन्न रूपांनीं भेटायला येणारा पाऊस हाहि असाच लक्षणीय आहे.

'चित्र', 'एक ढग 'वृक्ष', 'मलिन पानांना', 'उशीरां तिसऱ्या प्रहरीं' यांतील निसर्ग किंवा 'वाट तूझी पैंजणाची', 'इंदुमुखी रमणरात', आज पुन्हां' अशा कवितांतील प्रीति यांची जात अगदीं निरनिराळी असली तरी काळेले त्यांतलें सौंदर्य कसे प्रगट करतात, तें पाहण्याजोगें आहे. 'कपडे', 'गाणें', 'स्मित' इत्यादि कवितांतून त्यांचें सौंदर्यलुब्ध मन जेव्हां सामाजिक जाणीव प्रगट करूं लागतें तेव्हां कडू आणि गोड अनुभव त्यांच्या कविमनाला सारख्याच तीव्रतेनें कसे जाणवतात हें सहज लक्षांत येतें. 'तुझ्या रंगाला भुलला श्रावण ग' हें गीत लिहिणारे काळेले 'मी' कवितेंत

> असे मी समंतांत सर्वान्तरीं मी
> तरी स्वान्तरीं का असोनी असेना

असा प्रश्न विचारण्याइतके अंतर्मुख होतात; आणि ' तडाग असतों तर ' या कवितेंतले सौंदर्यपूजक काळेले ' तैमूर ' कवितेंत मूर्तिभंजक होतात. भाववृत्तीच्या या विविध पैलूंमुळें त्यांची कविता रोचक झाली आहे. प्रत्येक सत्कवि हा गात गात आकाशांत उडणारा एक विहंगम असतो. त्याचा मार्ग कुणी आंखून देत नाहीं. अंतःस्फूर्तीच त्याला तो दाखवीत असते. निळें आकाश, सोनेरी उन्हें, हिरवीगार वनराई, उत्तुंग पर्वत-शिखरें हे त्याचे खरे सगेसोयरे. या एकाकी प्रवासांत आणि स्वानंद समाधींत त्याचें जें स्वच्छंद पूजन चालतें तेंच तुमचेंआमचें काव्य. काळेल्यांचा यापुढचा हा प्रवास उंच अवकाशांतून होवो आणि महाराष्ट्र व त्याच्या भौगोलिक सीमेबाहेर असलेले मराठीभाषिक यांच्यामधला कधींहि न तुटणारा दुवा होण्याचें भाग्य तांब्यांच्याप्रमाणें काळेल्यांच्या कवितेलाहि लाभो, असें मी मनःपूर्वक इच्छितों.

कोल्हापूर
२४-७-६४

**वि. स. खांडेकर**

## अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | वाट तूझी पैंजणांची | ९ |
| २ | कसे म्हणू की | १० |
| ३ | अजुनि वाटते मला | १२ |
| ४ | पाकोळ्या | १४ |
| ५ | गीत डोलते | १६ |
| ६ | आज पुन्हा | १८ |
| ७ | दिवा | २० |
| ८ | नुक्ताच झाला आहे | २२ |
| ९ | इंदुमुखी रमणरात | २३ |
| १० | चिंच | २५ |
| ११ | रिप रिप काळा पाऊस | २७ |
| १२ | कुंपण | २९ |
| १३ | काही ते रंगीत | ३१ |
| १४ | जंगलाची वाट | ३३ |
| १५ | दिवस अंध उभा | ३५ |
| १६ | कपडे | ३७ |
| १७ | अशी असावी रजनी | ३९ |
| १८ | नदी | ४१ |
| १९ | पिवळे | ४३ |
| २० | श्रावण | ४५ |
| २१ | असू दे | ४७ |
| २२ | एक ढग | ४९ |
| २३ | रात्र झाली, की | ५३ |

## अनुक्रम


२४ अपरात्रीच्या जांभईमधे ५५
२५ असे झाले आहे काही ५७
२६ गाणे ५९
२७ वृक्ष ६१
२८ पडुन तरुतळीं ६४
२९ उशिरा तिसऱ्या प्रहरी ६५
३० मलिन पानांना ६६
३१ मी पाहिले ६८
३२ लुमुंबाची बायको ७०
३३ स्मित ७२
३४ तुझ्या रंगाला ७५
३५ चंद्रवेडे झाड ७७
३६ शोध ७९
३७ कागदइच्छा ८१
३८ भेट ८३
३९ अशी वेळ ८५
४० मी ८७
४१ दोन मने ८९
४२ ऊब ९२
४३ तडाग असतो तर... ९३
४४ तैमूर ९६
४५ एकांत ९८

## वाट तूझी पैंजणांची...

दा. क्र.
शाखा (स्थळ

वाट तूझी पैंजणांची
तांबड्या उत्फुल्लतेने
उंच चिंचा, निंबुणी
वायु चुंबी पल्लवांनी
हा बगीचा–बंगल्यांचा
गंध या ताज्या फुलांचा
दूरता नीलान्त ही
चंचला वेलीकमानी
चांदण्यांचे हास्य तूझे
नाचरा गे छंद तूझ्या
तू नदी स्वच्छन्द–गा
कैक हे मजनू उभे
दूरुनी मी हुंगतो
प्राशितो या लोचनांनी

गीत कंपी सांज वेळा
भारला हा बागवेला
टोकास पाने केशराची
पोवळ्याचा साज केला
रम्य हिर्वागार शेव
गंधवाहे दूर नेला
तू त्यात गौरे ! चारुहंसी
झेलते तारुण्यझेला
त्यामधे बुल्बुलतरंग
चंद्रकोरी झूलतेला
मी तो किनाऱ्याचे लव्हाळे
लीलावती तू एक लय्ला !
तारुण्य तूझे हे सुगंधी
स्वादु हा पीयूषपेला...

इंदूर, १९५७

# कसे म्हणू की...

कसे म्हणू, की हिरव्या हिरव्या
डोंगरामधे आहे शांती ?
कसे म्हणू, की निर्झरातुनी
सुखेच गाणी वाहत जाती ?

कसे म्हणू, की या वाऱ्याला
भटक्या खेळाचा चळ चंचल ?
कसे म्हणू, की पुष्पालागी
दिले स्मिताचे विकसन केवळ ?

कुणास ठाउक डोंगरउदरी
असेल दडलेले भूकंपन
कुणि सांगावे ? निर्झरातळी
असेलही खुपते रुपते मन

या वाऱ्याच्या मनी कदाचित्
घोळत काही तुफान राहे
कुणास माहित ? फुलपाकांची
मुकी काहि जी तळमळ आहे

खुळ्या मानवा ! तुला वाटते
तुझ्याच केवळ बडबडण्यात
तळमळणारे, धडपडणारे
भरले सगळे ब्रह्म अशान्त

चराचराच्या पण हृदयातिल
अतर्क्य जे जे अनुक्त भाव
त्या सर्वांना द्याया वाचा
सरस्वतीला कोठे वाव ?

उमजेच्या खिडकीतुन आम्ही
नुमजेचे बघतो आकाश
आणि निकट्या विश्वासावरती
उगिच सोडतो हे निःश्वास...

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३७९५१९... वि: काव्य.
क्रमांक १६५४... नों. दि. ३।३।६५

इंदूर, १९५४

# अजुनि वाटते मला...

अजुनि वाटते मला
फांदीच्या हिरव्या पंखावर
        उंच झुलावा झुला...

काळ्या पाण्यामधे पहावे
कागदहोडित बसुन फिरावे
मोडक्याच ओलांडुनि जावे
        जुन्या फळीच्या पुला...

काठावरला फेस धरावा
सोनेरी कवडसा करावा
उन्हावरी उडवित टाकाव्या
        इंद्र-धनूंच्या चुळा...

जावे कोठे निळ्या ठिकाणी
डोंगरात फेकावी गाणी
चेंडूपरि झेलावा कानी
        प्रतिध्वनी आपला...

# अजुनि वाटते मला...

अजुनि वाटते मला
फांदीच्या हिरव्या पंखावर
        उंच झुलावा झुला...

काळ्या पाण्यामधे पहावे
कागदहोडित बसुन फिरावे
मोडक्याच ओलांडुनि जावे
        जुन्या फळीच्या पुला...

काठावरला फेस धरावा
सोनेरी कवडसा करावा
उन्हावरी उडवित टाकाव्या
        इंद्र-धनूंच्या चुळा...

जावे कोठे निळ्या ठिकाणी
डोंगरात फेकावी गाणी
चेंडूपरि झेलावा कानी
        प्रतिध्वनी आपला...

वेचावे गारांचे मोती
नाचावे वाऱ्याच्या भोती
झेलावा पाउस तळहाती
काळ्या मेघातला...

चिंचेचे पाडावे झुंबर
हलवावी बोरींची कंबर
दगडाने छेदावे अंबर
झेलत पडल्या फळा...

फुटक्या बुरुजातुन, दगडातुन,
गडद निळ्या-काळ्या साउलितुन,
हुडकित जावे विटांविटांतुन
अंधाराच्या मुळा...

हिंडत जाव्या भटक्या वाटा
त्यात रुतावा मजला काटा
तू काढावा इवल्या हाता
फुंकरीत पद-तळा

तुझा नि माझा काला व्हावा
चिमण्यांपरि संसार करावा;
फक्त त्यामधे खेळ असावा
आणि...नसाव्या कळा !

देवास, १९५४

# पाकोळ्या....

जुन्या विटांच्या थंड तमातुन
खोल छताच्या छातीमधुनी
हिरमुसलेल्या अंधारातुन

आल्या पाकोळ्या
झेपावत
काळोखाच्या झाडाची जणु
उडती पाने !

अभिष्टापरी भ्रमत माझिया डोक्यावरती
आल्या पाकोळ्या
गर्गरत्या...

लांब चेहऱ्याच्या चिंतेच्या
काळ्या किरिटाभवती घिरट्या घेत
हवेवर त्वरित वर्तुळे

पंखांच्या कात्रीने कापत
तिरकी...तिरपी...उभो...आडवी...

शून्यावरती गिरवित शून्ये
तरंगती जी हवेत अशुभे
त्यांची फिरवत गुप्त मंडले....

आल्या पाकोळ्या...

साउलिशी चोरटेच संधान बांधुनी
स्तब्धतेस पोखरीत घुसल्या...

खोलीमधला उजेड हुसकुन
बंद आतला वारा विसकुन
अंधाराचा खिसा कापुनी
बघता बघता पसार झाल्या...

गेल्या...पाकोळ्या...

देवास, १९५५

## गीत डोलते...

गीत डोलते मनामधे, पण
मनासारखा सूर जुळे ना
अर्थ घोळतो मनामधे, पण
मनासारखा शब्द मिळे ना

झुलतो फुलतो भुलता वारा
परी त्यात फुलवास उले ना
अधरी हा धरलाहे पावा
त्यात परंतु प्राण फुले ना

शोधत आहे भृंग फुलाला
गीताला शोधितसे फूल
गीत मनाचे मनात बसले
वाऱ्यावरती उठली हूल !

गीत उडाले वाऱ्यावरती
फक्त त्यातला कागद राहे
साकळलेल्या जलपृष्ठावर
तरंगही कोमजला आहे

रंगामधले हास्य निपटले
आभाळाने मिटले पंख
रुळावरी गडगडते आहे
यांत्रिकतेचे जीवन रंक

चक्रांच्या धडधडत्या धाइत
ऐकु येइ ना हृदयस्पंद
विस्कटल्या बेशिस्त धुराने
धुरकटले हो गीत सबंध

म्हणून रुसले गीत मनातिल
गीताची दिल्कळी खुले ना
वीणेवर झंकार उठे ना
कळीतुनी हुंकार फुटे ना...

रंग चढे ना, छंद जडे ना
धडधडता आनंद घडे ना
गुलाबास काटाच रुते ना
म्हणून माझे गीत उठे ना

इंदूर, १९५६

# आज पुन्हा...

आज पुन्हा चमकुन हर्षति तारे !
आज पुन्हा तिमिरहि ते हसणारे !
गीत तुझे मध्य-बहारीत खुले...
आणि तरे तरल वलय हलणारे...

आज पुन्हा आपण बसलो जवळी
तशिच पुन्हा दिल्‌खुलास तू हसली !
मन-मोगर शुभ्र कळ्या फुललेल्या
पिउनि तुझे संग-मधुर मधु वारे !

मउ वाळूवर फिरतो फेन नवा
वायूला गंध-पुलक ये हळवा
लहरींशी लहरींचा वक्ष जडुन
शपांतिल चळले रंगित पारे !

आज पुन्हा तू तरुणी...मीहि तरुण...
मज लवऱ्या फांदीचा मोह अजुन,
मोह तुझ्या या उघड्या खांद्यांचा
विरघळले ज्यावर कच-बंधारे...

आज पुन्हा मातिस ये कमल-गंध
इच्छेने शरिर बुजे रन्ध्ररन्ध्र
चाफ्याच्या लपलेल्या ऐन धुंद
दर्पाने दर्वळले जग सारे!

आज पुन्हा वसुधा ही छुमछुमते
रजत-सुधा झिरझिरीत झुमझुमते
शिरशिरीत कसल्याशा आज पुन्हा
मोकळली सुख-संवेदन-द्वारें!

इंदूर, १९५७

# दिवा

पौषाची थंडी ऐन　　　काळोखी भर रात
जगावर अल्लद फिरे　　　झोपेची गहिरी लाट

हिवाळ्या लांब रात्री　　　निद्रिस्त जग आहे
रस्त्याच्या एकांताला　　　एकला दिवा पाहे

एकला पाहे दिवा　　　न्याहाळी नीट पुन्हा
शोधतो धुळीमधे　　　धावलेल्यांच्या खुणा

निद्रेचा आला रंग　　　वस्तीला परोपरी
निश्चळ उभी घरे　　　गाडल्या भुतांपरी !

सारेच काही सुप्त !　　　कोणीही नाही जागे
एकटा बसे दिवा　　　उकलीत विचार-धागे

काळोखी भडक रात्र　　　पौषाचे कडक हीव
पोटाशी धरुन पाय　　　गेले हे झोपी जीव

रस्त्याच्या टोकावर        एकला दिवा राहे
रात्रीची हळू पावले        मोजीत बसला आहे

अशीच गेली रात्र !        झालेच जागे लोक
खांबाच्या खांद्यावरी        दिव्याला लागे झोप

दा. क.

इंदूर, १९५७

## नुक्ताच झाला आहे...

नुक्ताच झाला आहे
उशीर शिवारात
जमीनीवर काळ्या
पिवळ्या प्रकाशाची
शेवाला तुंद बैल
बाजूच्या बाभळीची
उनाड पाखराची
रूपस बोरे...पण
नवीच शिरशिरी
एकच चुनडी लाल
गवतात दबलेली
काचण कुंपणाची

पाऊस शेवटला
हा ऊस पेवटला
फिरतो आहे फाळ
फुटली आहे पाळ
ओढती औत संथ
सरली आता खंत
भिरकी वाऱ्यामधून
हिरवीच आहेत अजून
भरली कोनाकोनी
आणीक नाही कोणी !
उलगडे वाट पैल
हळूच झाली सैल....

इंदूर-सोनकच्छ मार्ग, १९५७

## इंदुमुखी रमण रात...

इंदु-मुखी रमण रात
स्पर्शसुखी भ्रमण वात
खोल दूर गूढ भरे
आकाशित भावनात
उरला एकान्त मधुर
मन-चुंबी ही वेळा
मंद जरा, अंधुक मग
शेवट मग पुसलेला...

या वेळी नदिजळात
स्वप्ने असतील पडत
फिरकत असतील अता
हळुच वन-पऱ्या बनात
दाट सघन वासाने
झाकुन गेलीच फुले
शृंगारिक तिमिराचा
केवळ सुस्पर्श कळे

रिक्त पथी फक्त अता
स्वैर मनोरथ धावे
जिकडे ही दीपरांग
तिकडे हिंडत जावे
या नादी रात्रीला
शब्द नको, गीत हवे
ताऱ्यांना मिचकावत चलु ल-ल-ला गात गात...

रात्रीचे दार बंद त्यात मिटे जग सगळे
मात्र तुझ्या खिडकीचे चौकोनी हृदय खुले
अंग उजू, बाजूला पदर असा गळलेला
आज तुझ्या ओठांचा रंग लाल भडक जास्त...

सज्जावर नम्र वेल काय तुला खूण करी ?
केला उच्चार न मी ऐकलेच तूहि तरी ?
तूच 'होय' म्हटले ना ?...की झाला भास मला ?
त्या धुंदित केव्हाचा मी उभाच उंबऱ्यात...

इंदूर, १९५८

## चिंच

स्थूल सावळा पघळच बांधा
जाड ठेंगणा ठोसर बुंधा
चाळीसावर वय गेले तरि
या चिंचेचा उघडा खांदा।

पाहुन घ्या कशि हौस हिची तरि
ही घेराची गोल नेसणी,
साउलिचा पायघोळ परकर
तंग फांदिचा उभार फाटा

हे चिंचांचे चपटे लांबट
डूल ( खरिच ही आंबटशौकिन ! )
हिच्या प्रौढशा भुरेपणातहि
आहे हिरवटपणा अजून—



रू...२

अन् चविष्ट लालसा लालसर
जी तोंडाला पाणी आणी...

संध्याकाळी चिंच उभी ही
रस्त्यावरती उगीच उडवित
रुमाल इवला सूर्य छबीचा...

पाहणार तरि कोण तिजकडे
(पोरांखेरिज)? अहो खरोखर
जो कुणि मोहे हिच्या लीलया...
"स वै भूतोऽथवा शिशुः"

इंदूर, ३० मे १९५८

## रिपिरिपि काळा पाऊस...

रिपिरिपि काळा पाऊस कालवतो अंधारात
हळू ओला वाहे वारा ओलेती आहे रात
किर्र किर्र रातकिडा दर्दुरख डराडरा
जळमाती ओविलेल्या वळचणी घराघरा

पिकून झडल्या निंबोणीचा उग्र दर्प गोड कडू
चांदणीसा हलता काजवा गवतावर लागे चढू
मासात मास, श्रावणमास ! वासात वास जुईवास !
श्रावणाच्या जुईमधे मिसळला तुझा श्वास

या रातीच्या ओच्यामधे सुवासिक गूढ काही
माझ्या मनी सुवास भरे, त्याला काही नाव नाही !
चिक्कण चिखल चकचकीत काळा गार तुडवतो
मनावरती शिंतोडाही हिरवागार उडवतो

खुशीखुशी बरसात चाल तुझी झुलवती
पाणी सपाट्, खाली खळ्गा, वाढ अशी भुलवती !
उमाप वाहे शेतनाला, रेती-माती काला झाला
चिंचेवर जाळीदार पानांचा ढग आला !

धारधार अंधारात ओळखीच्या बुजल्या वाटा
आहा ! अंगभरी आला हलव्याचा गोड काटा !
चिंबचिंब कळी, पान, झिम्म् झिम्म् बरसात
केतकीच्या कांतीवरली नागिणी गे, टाकी कात...

इंदूर, २२ जुलै १९५८

## कुंपण

लांब लांब कुंपण त्याचे निळेकाळे काटे
मुळावाचून गाडलेले वेलांटांचे फाटे

बाभळाचे नशीब आणि कुऱ्हाडीचा योग
उभा जन्म कुंपणाने घेतला असा जोग

जिव्हाळ्यावीण उगीच खाली चिकटलेली माती
रोमांचावीण भिजवणाऱ्या धारा बरसाती

एकामेकी अडकलेल्या शुष्क तंतोतंती
पीळ पाडीत होत्या तरी काही गुंतागुंती

लाल टणक माळ तिकडे नदीकडे जाई
कुंपणाच्या काळ्या मना तेच काही खाई

प्रकाशाच्या रेशमाला भोके भोके पाडीत
कुंपण बसे आपल्याशीच वारे ओरबाडीत

कधी एकाएकी आली कंकण—किण्किण् कुठून ?
कुंपणाच्या कानावरती फूल आले उठून !

गाभुळलेल्या अभ्राखाली निंदणीच्या कामा
वाकलेली रोपोरोपी रूपवती श्यामा

कुंपणाच्या बेरंगाला आली रंगित झाक
सरळ सिध्या काव्यांनाही आला नाजुक बाक

तशा खुशीत कुंपणाने वळविला इष्क रोख
ओढले धरून साजणीच्या पदराचे टोक !

इंदूर, १९५८

## काही ते रंगीत...

घोटाळते सांजेचिया उंबऱ्यावर
वेटाळते धुक्याचिया लपेटीवर

डहाळीच्या खुणेवर नाचत राही
डोकावल्या पानातून नवले पाही

फिक्या उन्हामधून जे उदास उडे
सावलीच्या बुरख्यात नाचते पुढे

चाळविते निळ्यावर दूर इच्छिते
पाण्यावर अप्सरांची लिपि लिहिते

पाहातसे क्षितिजाच्या पापणीवर
कालवे जे थरामधे अंधुकतर

लुकलुक चांदणीत टुकटुकते
उघड्याच रानामधे चुकचुकते

फुलामागे लागे ज्याची चाहूल कधी
हातोहात हारपते गवतामधी

बुबुळाला शिवे उघडझाप होताना
परंतु जे लागेचि ना पाच बोटांना

तरंगते ढगोढग किर्मिजी गुंगीत
हळू अनाकृति वारा आहे जे हुंगीत

पसरून पलिकडे मनाचा पंजा
धरू पाहे काही ते मी रंगीत रंगीत...

इंदूर, १९५९

# जंगलाची वाट

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ...३७८५७१... वि: ...९१०५...
क्रमांक ...१६५८... नों दि: ...३।३।६५

ओली रंगदार आहे वाट जंगलाची
उभा मुरुम–माळावर माड एकलाचि

ओसरून चालला हा पहिला पूर आता
नागमोड राहिलेल्या थीर वाळू–लाटा

झाली खडकाच्या पाठी मऊ मखमाली
दबे पावलाशी माती ठिसूळ कमाली

बोरीबाभळीचा तरी कवळाच काटा
दरडाला ओलांडुन जाय शेतफाटा

तांबुसले आहे जरा नदी-मुख-बिंब
धुंद आभाळाच्या खाली झाडे स्वप्नचिंब

हालताहे डोलताहे भादव्याचे रान
वाऱ्यावर केतकीचे गेले शुभ्र भान

पाय रोपी रोपामधे, कशी तळखतार
कमरेला विळा, त्याची नजरेला धार

रोमरोमी काही माझ्या रुमझुम झाले
लाल गुलालीच ढग चित्ती रंगा आले !

इंदूर, १९५९

# दिवस अंध उभा...

दिवस अंध उभा
नाही झिलई नभा
अशी कशीशीच प्रभाहीन प्रभात आहे

तोंड-झाकले आभाळ
धुकाट धुरकट सकाळ
कसा जड जड उजेड सारवला आहे

विस्तवात नाही त्राण
ना चुलीत काही प्राण
श्वास कोंडून उंच नाकाचे धुराडे हैराण आहे

उघडी भिकारीण एक, नागडी पोरे अनेक
अलुमिनमचा वाकडा वाडगा
फुटका डोळा वर फेकतो आहे

ओशट हुंगते ढोर, लोचट कुत्रे समोर
रात्रीची शिळी चतकोर
उष्टी चंद्रकोर फक्त उरली आहे

बेसूर गेली तार, गळतो पत्रा नळीदार
पिवळा चारा, भुरा वारा, कचरा काळा...
उदास ढगात घार शिरते आहे
पिवळे, भुरे, काळे, नळीदार, गळके मन
जगात गात फिरते आहे...

इंदूर, १९५९

## कपडे

ऊन्ह कडक...नील नदी...वाळु...
कुठे खडक खडक...
क्षितिजाच्या काठावर मेघपुंज
आणि नदीकाठावर हे कपडे
शुभ्र, निळे, लालभडक
कपड्यांचा हा बगिचा!

हे कपडे...एका तारेवरती ( तारेतच )
झुलणारे...झुलणारे...

कपड्यांनो! नाहि तुम्ही एकाचे,
कैकांचे, सगळ्यांचे
श्रीमंत नि गरिबांचे
लाखोंचे लाख तुम्ही

कुलिन, मलिन, तलम कुणी,
        जाडेभरडेहि कुणी
कुणि कोमल मृदु विदग्ध,
        खडबडीत कुणि प्राकृत
कोणि गरम, कोणि नरम,
कोणाच्या (इ) स्त्रिचा स्वभाव कडक (!)

कुणि श्रमात पिरगळले
कुणि गळ्यात गळुनि शयनलोळणात कुस्करले

भिन्न जागचेच तरी एकत्रच गाठोडुनि·आला तुम्हि
एकत्रच तुम्हि भिजला
        खळबळला, खळखळला
घट्ट मिठित आलिंगुनि तुम्हि पिळला
विसरुनिया सर्व भेद या एका सूत्रावर
        तुम्हि पडला...दिल्‌खुलास उलगडला,
                एक एक विलग घडी
                        कोनाकोनाहि खुला
                                मोकलले सर्व खिसे !

बाहीला बाहि जुळे
स्वच्छ उन्हे, स्वच्छ मने !

आतावर होत्या ज्या आठ्या, ज्या सुरकुत्याहि
जातिल त्या इस्तरुनी, निस्तरुनी,
    जाय अढी...विस्कटली नीट बसे
                परत घडी (परिट घडी)...

# अशी असावी रजनी...

अशी असावी रजनी
अर्ध परिस्फुट तिमिर कापरा
मी साजण, तू सजणी

इकडे तिकडे कुणी नसावे
तारांनी वर उगिच असावे
केवळ आभासात फसावे
क्षितिजे जावी बुजुनी

मोहमधुर तम आगेमागे
झाकुन जावे प्रकाशधागे
चंद्र लपावा क्षितिजामागे
दीपहि जावे विझुनी

अनोळखीचा गंध मिळावा
लपलेला निर्झर खिदळावा

झुलत काजवा हवेत जावा
वायु वहावा भिजुनी

शीतल कोमल सुख–पुलकांची
हळुहळु नाजुक कान गुजांची
हिरव्या काठावर बसण्याची
वाट घुसावी विजनी

तेच हास्य...तो मोह घडिघडी...
गीत–हेलकाव्यावर अगदी
मने पडावी सताड उघडी
सुख-स्वप्नांच्या सृजनी

फुले उद्याची मधु घडणारी
क्षणोक्षणी नव उलगडणारी
मधुर वयातच सापडणारी
अशी असावी रजनी...

इंदूर,

# नदी

नदी, नदी ! तू कधि वळणारी
दूर कधी पळणारी, ग...
पहिल्या वळणावर मिळणारी
प्रीत तुझी कळणारी, ग...

नभ-चुंबक डोळ्यातिल पाणी
चढती कमल-कमानी, ग...
भुइसपाट ही चाल, परंतू–
वरती नजर उताणी, ग...

फेसफेस अन् लहरीलहरी
तू जोषाच्या बहरी, ग...
डोह झाकला पदराखाली
नदि, तू गहिरी गहिरी, ग...

तू माशा ( झ्या ? ) स्तव तळमळणारी
स्पर्शाला हलणारी, ग...
काठावरती घागर घागर
भरणारी तू नारी, ग...

मृदु वाळू, विरघळ पद-माती
खळखळ जीवन-जाती, ग...
लाल तिराशी तोलुनि छाती
डोलत नावा जाती, ग...

नदी, नदी ! नाचत जाणारी
समुद्रास मिळणारी, ग...
या ओव्याची ओढ नदी पण
तुला कधी कळणारी ? ग...

इंदूर, १२ जून १९६०

## पिवळे

बिनरंगाच्या घरास माझ्या
रंग दिला हो पिवळा कोणी ?
चिटक्या चिट-भिंतीला पिवळी
अचिट कळा तरि कळे कुठोनी ?

फटीफटीतहि भरले कोणी
रंगित, पिवळे, संगित धागे ?
मनकोन्यातच सहजी माझ्या
काहीसे पिवळे हो जागे...

खिडकीच्या भानास शिवे का
हळु चाहुल पिवळी लयकारी ?
कोण उडविते अंगणात ही
हर्षाची पिवळी पिचकारी ?

ही गीताची लकेर पिवळी
पानांच्या कानी का पडली ?
हळुच पायरीवरी कुणाची
सोनपावले पिवळी चढली ?

कुणी टाकली माझ्यावरती
सोन्याची शृंगारिक चूळ ?
क्वचित आले माझ्या पिवळे
उंबऱ्यास का उंबरफूल ?

कोमल, कोऱ्या, कोमट, गोऱ्या
हळद लावुनी पिवळी अंगा
दार उघडुनी येणारी तू
नरम उन्हाची नार सुरंगा...

इंदूर, १९६०

## श्रावण

आला श्रावण छेडत कोमल
विचित्रवीणा जल-धारांची
गंध-वसन कतकिच फडत
हे झेलत नभ-मोती...नाचवीत भोती
प्रियदर्शन मुग्ध मेनका हिरवाळीची !

उडवित मौजेची कारंजी
तेरडा नि तगरीशी घालित रुंजी
पुष्पितशा रंगीत भावना खुलवित आला
घालित रस्त्याच्या कंठी जल-माला
घडवित हृदयंगम मधुसंगम जळ-मातीचा
आला नवपातींचा श्रावण...
पसरुनि पंजे मोरपिसांचे
आकाशाचे शिंपत अत्तर

लिहीन सुंदर वेलपत्तिच्या
वक्रोक्तीच्या हिरव्या कविता !

ठिबकवीत वळचणिचे पैंजण
तारेवर लटकवीत ओले
उत्कंठित थेंबांचे डोळे
चाळवीत इच्छांचे बुद्बुद
हसरा खुद्खुद्

परोपरीच्या वेलबुटींचा
मण्यामण्यांचा...रमण्यांसह रमण्याचा
बहारिचा चमकदार ताजा श्रावण राजा...

झिम झिम चरणांचा
रिम झिम नव आभरणांचा
चुंब-प्रीतिचा...बिंब-रीतिचा
ओलेल्या भिजल्या भेटींचा
चारुदत्त नी वसंतसेना
यांचा प्रियतम...

बिरहीको तरसानेवाला
झडीझडी बरसानेवाला
श्रावण आला...
आला श्रावण !

इंदूर.

## असू दे

असू दे मोकाट काटेरान दाट
एक पाउलवाट असू दे मला

भरू दे अफाट अभ्र आभाळात
एक तारा त्यात दिसू दे मला

असू दे मळूल वाटेमधे धूळ
कुठे एक फूल हसू दे मला

शोधू दे निर्जळ साहारा सकळ
दूर मृगजळ दिसू दे मला

येऊ दे पहाड उदंड उनाड
बर्फमय भवती गोठू दे ओसाड

बर्फाला लक्षीत अनामिक आड
गाणाराच पक्षी भेटू दे मला

येउ दे अचाट सागरभरती लाट
पुसून जावो त्याने सगळा वाळूकाठ

अशा भटकलेल्या भंगुर अज्ञातात
इवलासाच मोती वेचू दे मला...

इंदूर, १९६०

# एक ढग

एक ढग, नाना आकार
प्रकार प्रकार
आभाळ बोले
वारा हाले
ढगाचे आकार आकार झाले

ढगा, तुझे रूप काय ?
इच्छी ते ते बनत जाय

सुपासारखा आला कान
घडवंची ही जिराफमान
पुरुष थोडा, बैल थोडा
अर्धा माणूस, अर्धा घोडा
अघटित काही मानवबांधा

खाली डोके
वरती खांदा
छातीमधे एक डोळा
    कापुसकानी शिंगे सोळा...

ढगा ! मला तुझ्यापरी
    रूपे रूपे घेतिल का ?
ढगा ! तुझा काम-रूप-मंत्र
        मला देशिल का ?

बहुरुप्यांचा ढग राजा !
    बहुरूपीच छंद माझा...

मला वाटे
    अशी रूपे रूपे घ्यावी
मला वाटे साकारावे बहुभावी,
    वाटे मला
        सिंह व्हावे, हरिण व्हावे,
        देव व्हावे, दैत्य व्हावे,
मत्स्य-कच्छ-वराहादि
    दाही अवतार घ्यावे...
    सिंदबादच्या सफरीमधील
        अजस्र पक्षिरूप यावे...
मेस्तादोनच्या महारूपे आकाशभर व्यापून जावे

ब्रोन्तोसोरस बनून
    लांब क्षितिजावर पसरावे
वेटाळावे...रेखाटावे...

किनाराचे...
पिंजत जावे...
टिंबत जावे...

पण मी तर एकच एक
एकच एक, तोच मी
रोज आरशात पाहतो मी
मुखडा माझा तोच तो
तेच डोळे...तेच कान...
तेच ध्यान...

सर्वकाळ तोच मी
भिंतीवरती तोच मी...
पडभिंतीवर तोच मी...
सावलीत, पडसावलीत
एकच एक तोच मी...
तस्विरीच्या चौकटीत
ठोकलेला तोच मी
हाडामासात गाडलेला
दगडात कोरून काढलेला
एकच एक...
तोच मी...

धूम, ज्योति, पाणी, वारा,
ढग रूपे बदलणारा...

माझ्या अंतराळातसुद्धा तसाच एक ढग आहे
बहुधारणेची त्याला बहुपीडती रग आहे

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १४०६८
शाखा

अंतरीच्या बहुरूपी मेघराया
पीडा माझी फिट्ट दे
आखडणारी व्यक्तिसीमा तुट्ट दे
अस्मितेची एकलकोंडी फुट्ट दे
एकाकार पोलादातून सुट्ट दे
एकामधून उठू दे
इच्छितांच्या बहुपणी नटू दे
रूपे रूपे लुटू दे रे...
लुट्ट दे...

इंदूर, १७ जून १९६०

## रात्र झाली, की...

रात्र झाली, की
माझ्या दारापुढची वाट
अचानक जाते कुठेतरी पळून
पकडून अंधाराचा हात

रात्र झाली, की
माझ्या दारापुढले झाड
चढून बसते चंद्राआड
तारांच्या सावल्या बनतात पाने
उभे राहते गाणे आकाशभर एक उनाड

रात्र झाली, की
भिंती रंगवितात गाल
रंगतात पायऱ्यांची नखे लाल

गच्चीच्या कानात
हळू कुजबजते आभाळ

रात्र झाली, की
करतो मी एक दार बंद, तर उघडतेच दुसरे
कोपरा हात पसरे
आणि मोकलते आतले संबंध...

रात्र झाली, की
निकिता नी आइक विसरतात शुद्ध
संपते शीतयुद्ध...आणि उरते शीत...
ध्यानस्थ शुभ्र शीत !
ओट्यावर माझ्या येऊन बसतो बुद्ध...

इंदूर, ३० जुलै १९६०

## अपरात्रीच्या जांभईमधे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ....३७८५९.. विः ....८१८५.
क्रमांक ....१६५४७.... नोंद दि: ...२।३।८५

अपरात्रीच्या जांभईमधे
सेकंदाचा किरटा काटा
सुटुन तबकडीमधून, बनतो
राडाराचा फिरता फाटा

अपरात्रीच्या जांभईपुढे
घड्याळ पसरे जगड्व्याळ मुख
नालबंद मिनिटांच्या टापा
दौडत हाणित ठोकर ठक् ठक्

अपरात्रीच्या जांभईतुनी
या खिडकीची चौकट सरते
इटुकल्याच बिस्तरी दिव्याचे
खोलीभर हे ऊन्ह पसरते

अपरात्रीच्या जांभइतिल मी
विराट् साउलिस माझ्या भीतो
अन् मच्छरदाणीच्या एका
भोकातच कीटाणू बनतो...

इंदूर, ७ ऑगस्ट १९६०

## असे झाले आहे काही...

असे झाले काही, की
        या रात्रीला
                त्या ताऱ्यांची खात्री नाही
सूर्य तिरप्या संशयाने पाही
        असे झाले आहे काही

पानांच्या पोटात
        वाऱ्याचे गुपित लुपे
फुलताना कळी
        मधेच काटा रुपे

डोंगराच्या चित्तामधे खड्याएवढा किन्तु
प्रत्येकाच्या डोक्यावर फिरते एक यू–टू

न्याहाळतोच खिडकीचा बंद तरी डोळा
छपराचे चारही कान झाले
भिंतीपाशी गोळा
छताशी वटवाघुळाचे
उलटे उलटे बेत
दारापासून लपवलेला
कोपऱ्याचा हेत...

खांब तरी जमिनीला जामीन उभा राहील का.?
आता लाट किनाऱ्याशी बेलाशक जाईल का ?

अरे...
साउलीला माझ्या
मी दु:स्वासाने पाही
मीच मला दूर...
असेच झाले आहे काही...

इंदूर, २६ ऑक्टोबर १९६०

## गाणे

...

...

...

दुपार होती, घाई नव्हती
सगळी आळी निपचित पडली होती
ढेकर देउन दारे मिटली होती
लांब जांभई खिडकीलाही येतच होती
पलंग पडला होता आरामाने
फिरवित तुडुंब पंजा पोटावरती...
तशात आले गाणे...कुठुन ? न जाणे
जणु वारे विरघळून गेले त्याने
सूर नाचले मोती लाउन झालर मोती
परंतु त्या गाण्याची जात निराळी होती...

असते गाणे नुसते डोलायाचे
छंदाचे, निर्हेतुक आनंदाचे
ते तसले नव्हते गाणे, जरि ते गोजिरवाणे
गाणे होते गोड...
परंतु माझ्या काळिजास आला हो फोड !

किन्नरसम आवाज होता तो...पण आज
माझ्यामधल्या माणुसकीला वाटुन गेली लाज
पाहुनि गाणे फिरते रस्तोरस्ती...

ते होते गाणे पोटाच्या सक्तीचे
दुपार बाराच्या वक्तीचे
उष्ट्या तुकड्याच्या भक्तीचे...
होते गाणे दीड वीतीच्या या खळगीचे
उपाशीच सलगीचे
होते गाणे ज्वाळाहीन अशा आगीचे
उदरातिल पोकळ जागीचे...

ते गाणे
पाखडीत पिवळी पाने
बाहेरी बहिऱ्या भिंतीवर भिरभिरले
निर्मनुष्य रस्त्यावर फिरले
माझ्या कानी शिरले...कढत कढतसे
चिरले पोटी...चिरले पोटी !
गेले गाणे मागत रोटी रोटी !

आजवरी मी समजत होतो
की भरलेल्या हृदयामधुनी उपजे गाणे
परंतु आता जाणे...की निपजतेहि सुंदर गाणे
कधी रिकाम्या पोटी...रिकाम्या पोटी !

इंदूर, १० डिसेंबर १९६०

## वृक्ष

अधस्तात भूमीमधे गाडलेला
नभस्तात उत्तुंग मी वाढलेला
वरी खालतीही विभागून ऐसा
साद्यन्त फैलावलो ऐसपैसा

तमिस्रात मी पाय हे सोडलेले
असे उंच बाहू प्रकाशात नेले
उरी लावतो घट्ट मी पार्थिवास
वरी शोधतो शोधतो दिव्य वास

रहस्यामधे भूदरी चाचपीतो
तिथे काढतो थेट पाताळभेद
वरी लक्षितो दृष्टिची ऊर्ध्व टोके
अनंतातुनी घे निळा काहि वेध

उभाचा उभा ठाकलो एक ठाया
जमीनीत केलेच बंदिस्त पायां
तरी संचरे मी खुला मूलगामी
क्षितीअंतरीही किती दूर जाया

भुई खालती थंड मातीच माती
निराळी मिळाली तिथे चेतना ती
कृमी वळवळे, कोरतो कीट खाली
परी स्कंधि बैसोनिया पक्षि गाती

गढे मी, जडे मी जडाच्या अगाधी
पुरा मृत्तिकामग्न घेतो समाधी
हळू हालल्याही हवेला धरीत
वरीच्यावरी झेलतो गोड गीत

बहू भक्तिने भोगतो पार्थिवास
मला सोडवेना जरा भूमिपाश
परंतु फुलांच्या मिषाने मधून
मला तारकांचेच होतात भास

निसर्गातले सूत्र मी हालवीतो
चमत्कार पेरांतुनी पालवीतो
मनी गंध उच्चार मंत्रून काही
सभोवार वाऱ्यामधे कालवीतो

अहा ! मातिला दिव्य हो स्पर्श झाला
मदभ्यन्तरा रम्य उद्बोध आला

निमे मृत्तिका...वृत्ति रामण्य झाली
जडाला फुलांची प्रचीती मिळाली!

जगाला फुले फक्त माझी दिसावी
मुळे अंतरी लुप्त कोठे असावी
कुणी पाहिला खोल जो गुप्त साचा
मला भेटलासे झरा जीवनाचा?

भरे मी हरिद्वर्ण कारुण्यवर्षे
नव्या पल्लवे होय शृंगार-रागी
मधूनी फिकी ये उदासीनता ही
तपोनी पुरा मी कधी हो विरागी

फुटे पानुनी, रूपतो मी, फुले मी,
भरोनी रसे मी फळालाहि येतो
गळे मी, पडे मी, सरे मी, तरीही
अमर्त्यांतुनी मी पुन्हा जन्म घेतो...

इंदूर, १९६०

## पडुन तरुतळी

पडुन तरुतळी पाहत होतो
नभाकडे मी खोल खालते
तर दिसले की...नभात उगवुन
झाड उंच ये भुईत वरते

दिसले की...फांद्यांना आले
नक्षत्रांचे झुबके पुष्कळ
आणि लागले टोकावरती
मम ओठाशी चंद्राचे फळ...

इंदूर

## उशीरा तिसऱ्या प्रहरी...

उशीरा तिसऱ्या प्रहरी मळमळीत पाऊस पडला
पाणचट बेचव प्रकाश उगीच होता अडला
निरुत्तर बनले ढग वीज चेतत नव्हती
एकच चिंधी उडवीत उडाले वारे भवती

कावकाव कावळे होते कंगाल पिंपळाच्या पोटात
ओला वंगाळ उच्चार अर्धवट मातीच्या ओठात
गिरणीच्या कपाळी मळवट मळकट धुराचा लांब
बोडकेच दोन भय्ये एकच रोडका खांब

दाराच्या फटीफटीत फटफटीत पाहे रस्ता
तारांच्या अटीतटीत अटकलाच दिवा नुस्ता
ऐन सांजवेळी पश्चिमा लाल नव्हती
तिकडे फक्त एक चिता भडकत होती...

इंदूर, २८ जानेवारी १९६१

## मलिन पानांना...

मलिन पानांना, लाल पाचोळयाला
जरा फुंकरून जाणारा वारा

सुस्त ढगाचा डोळा चुकवून
मधेच एखादी निसटते गारा

मातीच्या जुन्या पिवळ्या शेजारी
पायरीच्या काठाशी ओठ तुटलेला

चिंचोळ्या उंचात चिंचेला पाहून
काळया जळाचा डोळा फुटलेला

फत्तर ओळीत धुरोळा चोळीत
फिक्कट गालांचा चोपलेला निंब

कधी न हाललेल्या पडक्या पडछायांत
बगळयाचे ठिबक्के पुसट पांढरे टिंब

धुराचा शेंदूर, यंत्रांचा बदसूर
छाती एकांताची क्रूर खोदणारा

मळक्या कपड्यांचा कोणी एक भेसूर
पुलाखाली दूर काही शोधणारा

पक्षी-पंथाची मोजण्याला लांबी
आडव्या आभाळी तार लांबली

गारठ्यामधे बाभळीला टेकून
संध्याकाळेची पाठ आंबली

इंदूर, ११ फेब्रुवारी १९६१

## मी बाहिले...

मी बाहिले तुज नीरदापरि गर्जुनी
बाहिले तुज पल्लवांपरि तर्जुनी
मोरापरी मी कंठ उचलुनि बाहिले
बाहिले तरि तू जराहि न पाहिले...

आर्त मी आलापिले तुज पंचमी
आलापिले अति कापुनी स्वर उंच मी
कोकिळा बनुनी तुझी मी गाइले
मी गाइले – वाऱ्यावरी ते राहिले...

मी चातकीशी तुजकडे टक लाविली
क्षणही परी घन-वीक्षणे नच पावली
मी याचिले तुजलागि लागोपाठही
नाहि रे वळली मुळी तव पाठही...

## मी बाहिले...

मी बाहिले तुज नीरदापरि गर्जुनी
बाहिले तुज पल्लवांपरि तर्जुनी
मोरापरी मी कंठ उचलुनि बाहिले
बाहिले तरि तू जराहि न पाहिले...

आर्त मी आलापिले तुज पंचमी
आलापिले अति कापुनी स्वर उंच मी
कोकिळा बनुनी तुझी मी गाइले
मी गाइले – वाऱ्यावरी ते राहिले...

मी चातकीशी तुजकडे टक लाविली
क्षणही परी घन–वीक्षणे नच पावली
मी याचिले तुजलागि लागोपाठही
नाहि रे वळली मुळी तव पाठही...

मग राहिले...नुसतीच अशि मी राहिले
राहिले...डोळे मिटूनच साहिले
तू पाहिले – तू पाहिले...मी वाहिले...
तव दृष्टिच्या वृष्टीत पुरती नाहिले...

इंदूर, १७ एप्रिल १९६१

# लुमुंबाची बायको

अशी गेली ती उंच करून हात ओसाड
उरुराट काळ्या फांद्यांचे जणू चालते झाड!
वर चढले दोन की करुणासूर कातडी
उगवले काळे पीडा-किरण की फाडुन आतडी !

दोन्ही हातांनी आकाश-दगडाचा आधार धरी
दिवसाचा विस्तव ठेवला तिने मस्तकावरी
सांडला दूर पदर, टाकले उघडे उराड,
अशी गेली ती उंच करून हात ओसाड

सात मुडद्यांखाली लुमुंबा तिचा गाडला होता
राखणवाला वृक्षाचा रावण बैसला मोठा
पानापानावर लुमुंबाचा ओठ जाड लोंबतो
त्याचा पांढरा काजव्याला एक डोळा झोंबतो

अजून तिथे लकाकधारा संगीन कापे
बोराएवढा रक्ताचा थेंब मधे टपापे
अजून तिथे जमिनीला शिवे ओणवा श्वास
लागून गोळी तडकून गेला सूर्यप्रकाश !

एक किंकाळी चुकून गेली ब्रह्माण्डापोटी
कैक श्वासवे सुकून मेली हवेच्या ओठी
अशी गेली ती चर्चून दुपार उताण्या भाळी
आणि अनवाणी उन्हात वाळूची राळ उडाली...

इंदूर, ३० एप्रिल १९६१

## स्मित

झाले साडे आठ...तरी का
अजुन दूधवाला न आला...
म्हणून कुरकुर करित ( मनाशी )
...आज दूधवाल्याचासुद्धा
रविवारच जणु!...
गेलो दारी शोधायाला त्याला...

तो मज दिसला कोणी मुलगा
कधि न दूध प्यालेला
चार आपल्या भावंडांना
सांभाळत बसलेला—
सावलीत त्या,
जी होती माझ्याच घराची
परंतु नव्हती मालकिची जी माझ्या...

जी रस्त्यावर पडली होती
रात्रीच्या तुकड्यासम...काळी काळी....
( परंतु त्या मुलग्याहुन उजळ जराशी )

पाचहि त्या पोरांची आई,
विशीतिशीतिल बाई,
उचलत होती शिमिटतगारी
आजदिखिल...रविवारी...

आले माझे दूध...
उकळला चहा...एकदा...दुसऱ्यांदा...
( कडक दुपारी कडक चहाची मजा निराळी ! )
...आणि पुन्हा मग तिसऱ्यांदाही...

तोवर गेला होता उकळुन तिकडे चहाच
त्या पोरांच्या पाच जिवांचा !
बनली भुकटी त्या बाईच्या श्रमिक तनूची
आणी उरला होता नुसता तपकिरि काळा चोथा...

दिवस संपता
बाईच्या हातावर पडले पैसे...मोजुन...
एक रुपाया न पै सदोतिस...!
तिच्या मुखावरल्या शिमिटाचे चमकलेच स्मित !

मग आईभवती जमली ती
पंचमुखी वल्ललता...

आणि...
हात उचलले अहा दहा ते...
बोटांच्या पन्नास पाकळ्या खुलल्या...
मागत, मागत... " मा ! मा ! " मागत...

त्या आईने फिरुन मोजले पैसे
( मोजुन सगळी अपुली बाळे )...
एक रुपाया न पै सदोतिस...

आणि पुन्हा त्या तिच्या
स्मिताचे शिमिटच झाले...
शिमिटच झाले !

इंदुर, २९ एप्रिल १९६२

## तुझ्या रंगाला...

तुझ्या रंगाला झुलला श्रावण, ग
करी अंगाला मोत्याची लावण, ग

पाऊस, उन्हे, शेते उभी मधी
अडवुन धरी अचानक नदी
राही बाजूला नाव, कुठे गाव न, ग

तिरप्या खुशीत सरीसरी किती
मोरपिसांची डोळस प्रीती
इंद्रधनू कमानी नेत्र-पावन, ग

रिमझिम् नाचले शिंपुन बन
लिंपुन आले सुगंधी क्षण
हिरवा चाफा, केतकी मनभावन, ग

घळल्या पदरावर श्रावण–ओली
गाता गाता गाणी झाली ओली
शुद्ध कुठे ? तुटे चित्त-दावण, ग

अहा ! दिसे कनक-हरिण-दिशा
सीते ! सांभाळ लक्ष्मण-रेषा
असेल बसला हेरीत कुणि रावण, ग

इंदूर, ३ जुलै १९६२

# चंद्रवेडे झाड

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३७८५१ वि: काव्य.
क्रमांक १६५२ नों दि: ३।३।६५

त्या झाडाला असेच होते चंद्राचे वेड
चंद्रावाचुन सुचे न दुसरे, एकच तो वेध
खोलुन शाखा चंद्रासाठी नित्य बसे झाड
चंद्रप्रतीक्षा एकसारखी करि पानांआड
झाडाला त्या जणू येतसे चंद्राचे भरते
चंद्रापाठी झाड उगवले आकाशावरते

मग चंद्राला फुटती हिरवी झाडाची पाने
झाडा येती रुपेर किरणे चंद्राच्या ध्याने
कशी चंद्रमय होउन बसती फांद्यांची टोके !
त्या झाडाचे चंद्रवेड घे रात्रभरी झोके

एकारात्री गेला हरपुन चंद्र ढगांआड
वादळ ओढित तडकाफडका उन्मळले झाड !

झाले उलथे...कलथे सगळा पर्णित संभार
कोलमडे निश्चेष्ट खालती नुसता विस्तार !

●

मूळ उपटले; मुळातले पण वेड मुळी जडले
मुख झाडाचे चंद्रउगवतीकडे वळुनि पडले

मरे वृक्ष...मरता चंद्राचा घे हट्टच काही
हात असा चंद्रास्तव त्याचा पसरलाच राही !

इंदूर, २६ जुलै १९६३

# शोध

शोधत होतो नभि लक्षित मी
ऊर्ध्वांकित आश्चर्यच मोठे
होतो शोधत मी आकाशी
जे प्रश्नांकित झाले होते

निळ्यानिळ्यावर नभानभावर
गूढ अनामिक शोधत होतो
शोधत होतो किलकिलणारा
शेवट वरचा बिंदु अहो तो...

नभान्तरी मी शोधत असता
शोधत किरणे भूवर आली
तरल ढगांच्या विरल फटीतुन
घेत जरा कानोसा खाली

इंदूर, १९५७

टाकुनिया वर आभाळाला
किरणे ती भुइवरीच बसली
गूढ काहिसे शोधत एका—
डबक्याच्या तळमनात घुसली...

इंदूर, २८ ऑगस्ट १९६३

## क़ागद इच्छा

समोरच्या भिंतीस चिकटल्या
कागद इच्छा
लाल, पोपटी, चौकोनी चौकोनी रंगित इच्छा
कागदीच पण सर्व बिचाऱ्या...
काल लावल्या,
आज फाटल्या,
हवेत गेला कागद...

शब्द टरकले ( विना वाचल्या )
अर्थ चिरकला ( कळण्यापूर्विच )
उरल्या चिंध्या...नुसत्या चिंध्या
ज्या भिंतीवर झुरल्या
कधी न पुरल्या
गेल्या फाटुन
तरी राहिल्या आतुन

सदैव चिकटुन बसल्या चित्ताच्या भिंतीला
फुका फिक्या फटफटीत इच्छा...

सडकेवरल्या
        भग्न दिव्याच्या
                भग्न एकल्या तिमिर विषादी
त्या भिंतीचा पुरवित पिच्छा...
        पुरता पिच्छा
                अनंत कागद इच्छा...

इंदूर, १८ जून १९६३

## भेट

झडतच होत्या भाद्रपदाच्या धारा
पडतच होता संतत पाऊस-मारा
पाउस...पाउस...पाउस...पाउस...नुस्ता !
नदीनदीचा बनून गेला रस्ता

वर्षण भीषण धरीत होते फेर
नव्हते फिरकत चिट्पाखरु बाहेर
शहरामधली बंद पडे रहदारी
आज भिकारीसुद्धा नव्हता दारी

एक कबूतर आड्यामध्ये घुसले
दुसरे...खोलित विणीत होते बसले
एकसारखी लागलीच जलधार
अशा झडीतच टक्टक् वाजे दार !

"कोण ?"...म्हणुनि ती गेली दारापाशी
हो अनपेक्षित दृष्टादृष्ट तयाशी...
झोडत पाउस सरसर सरसर आला
विसरच त्याचा पण प्रेमाला झाला !

नव्हती छत्री, पाउसकोटहि नव्हता
पावसात तो सचैल न्हाला होता
केश निथळती, क्लिन्नहि निटिलप्रांत
ठिबके त्याची राजकपूरी प्यान्ट

करित स्मिताची ओलेत्या बरसात
प्रेमाम्बुद तो ठाके उंबरठ्यात
विचित्र त्याला पाहुनिया भिजलेला
ने ओठाशी बोट लघळती लैला

"कित्ति रे भिजला !" म्हणे नयनि ये टिंब
घरात ती, तरि अंतरि झाली चिंब !

इंदूर, १५ ऑक्टोबर १९६३

## अशी वेळ...

वेळ अशी आहे की तू येशील येशील...
अधीर वाट पाहे चाफा
घालून कानामधे डूल
आभाळावर अधर नमला
कमानीचा कमालीचा रंगित पूल
गुलगुल वारा निंबफांदीशी मशगूल
आज न्यारा साज प्यारा लेशील, लेशील...

उभ्या नाचत पावसातच
दूर्वा ओल्या ओल्या गार
हसत लोळत पडली उताणीच कुरणे
लहरी लहरीदार
दोन पक्षी ओढले कुठे निळया जांभळ्या पार
ओढ तीच अंतरी तू घेशील, घेशील...

मांडवाच्या मांडीवर रेललेली छेलछबेली वेल
उजू नखऱ्यामधे उभी ताजी केळ
दोन्ही हाती रिमझिम मोती–झेल
जिकडेतिकडे हिरवी रेलचेल !
नुसता प्रीती-खेल...
( आज स्मशानाच्या भुऱ्याचाही गुलाबाशी मेळ )
अशी आहे वेळ
तू येशील...येशीलच येशील...

इंदूर, २२ ऑगस्ट १९६३

# मी

विहंगांमधे मी, सुरंगांमधे मी,
लता-पादपी मी, सुगंधामधे मी,
असे मी समंतात, सर्वान्तरी मी,
तरी स्वान्तरी का असोनी असेना ?

नदी डोह तो मी, तिथे पोहतो मी
नभाचा निळा गूढ जो मोह तो मी
वरी मेघमाळात मी माळलेला
परी मी मला भाळलेला दिसेना !

भुले शुभ्र अभ्र-भ्रमन्तीमधे मी
फसे कृष्णरात्रीचिया मी भुलावी
फसू पाहता मीच माझ्यात काही
फसोनी परंतू पुराही फसेना

वसे वाळवंटात तो शिंपला मी
बसे उंच शाखांवरी पंछि तो मी
सुखेनैव दूर्वास्तरी बैसताही
कसा अंतरी नीटसा मी बसेना ?

उषासंगती मी स्मिते फाकताहे
हिमाच्यासवे धौतसा हासताहे
असा हासतो हासणाऱ्या दिशांशी
तसा माझिया संगती मी हसेना !

खुल्या शांत रानांमधे नांदतो मी
तुफानात लाटांसवे भांडतो मी
परी मी खुळा हो खुळा, आपल्याशी—
न भांडू शके, आणि नांदू शके ना !

सुचे ते मला चांदणे गोड काही
सुचे ते सुरेल्या हवेचेहि गाणे
परी आतल्या आत काही सुचोनी
सुचोनीहि सारेच, काही सुचेना !

इंदूर, २८ फेब्रुवारी १९६४

## दोन मने

रात्री-बेरात्री उगीच जेव्हा
कुशीहून मी कुशीला वळे
शहाणे माझे मन म्हणते
झाक रे डोळे, झाक रे डोळे

झाकतो डोळे, उघडतो पुन्हा
मिटतो, पुन्हा पाहातो तिथे
पाहातो काही, पाहातो काय ?
उगीच तिथे, उगीच इथे...

शहाणे मन सांगते मला
सोड विचार...विचार सोडी...
फुकट खेद, फुकट चिंता
फुकट खंत...झोप ना मोडी

शहाणे मन म्हणते मला
होई शहाणा...झोप सुखाने
झोपसी न का ? झोपाया तुला
म्हणू का तरी एखादे गाणे ?

शहाणे मन मग ते गाई
नीज अंगाई...नीज अंगाई...
डोळिया माझ्या अंगाई येता
ओरडे वेडे मन " अगाई ! "

" अगाई...अगाई ! " किंचाळे कसे,
किंचाळत उठे, उठून बसे,
उगी उगी मी म्हणतो तरी
उगीच एकसारखे पुसे—

" कसे हो असे ? " ( जग हे असे )
" नको व्हावे हे " ( असेच होते )
" कोण करते-कोण मरते ! "
( चालायचे रे ! चालायचे ते )

" अन्याय ! अन्याय ! " ( जगन्याय हा )
" हा तर गुन्हा " ( पण शिक्षा त्या नाही )
वेडे मन ते आवळी मूठ
वाऱ्यालाच ते रागाने पाही

झोप रे झोप, म्हणतो मी त्याला
पण झोपेना, राहीच जागे

वेड्या मनाला झोपवू कसे ?
थोपटता ते आपटू लागे !

वेड्यासारखे हट्ट ते काही
घेतसे सगळ्या जगाचा ध्यास
आढ्याला बांधून विचार-दोरी
गळ्याला आता लावील फास !

शहाण्या मना ! झोप तू तरी
आणि मलाही झोप लागू दे
शहाण्याला हे करील वेडे....
सोड वेड्याला...त्याला जागू दे !

इंदूर, २१ मार्च, १९६४

# ऊब

माझ्या अंगाराची
आगीची मस व्हावी
फुंकुन मज कानि म्हणसि
जळतो मी, आणिक तू
संनिध बैसोन सतत
निरुत्साह मी होता
वोपिसि तव हात जवळ
जवळ उबेपुरता, तरि
कडक शिशिरचाव्याने
म्हणुन घेसि निकट मला
स्पर्श नको आगीचा
फक्त अशी मौजेची
झाल्यावर राख थंड
माझी सरताच ऊब

फक्त हवी ऊब तुला
तुज उष्मा सुखमृदुला
जळ रे जळ, जलद जलद...
घेसि फक्त ऊब सुखद
मज देसी उत्तेजन
सारितोस झट इंधन
( जवळ जरा, दूर खरा )
चटक्याला दूर बरा !
थिजशिल, जाशील मरुन
सेविसि मज जवळ बसुन
नलगे रे झुळि चटका
ऊब हवी दो घटका
बसशिल का जवळ इथे ?
अपुला संबंध कुठे ?

ग्वाल्हेर, १९५०

## तडाग असतो तर....

काळे आकाश...काळाकुट्ट प्रकाश
हातातल्या दैनिकात तशाच महापुराच्या बातम्या
काळ्या काळ्या भकास...

ब्रह्मपुत्र पूर...नर्मदा पूर...कृष्णा गोदा पूर
कावेरी पूरच पूर...
उध्वस्त उत्कल, केरळ, कोकण, म्हैसूर...
जिकडे तिकडे पाणी...पुलावर रुळावर, आणी–
रेल बंद, मोटारी बंद, ठप्प झाली वाहातूक संबंध...

माणसे मेली, बातम्या वाचल्या
वाहिली घरे, राहिली खिंडारे...कंकाल खिंडारे !

माझ्या डोळ्यासमोर नाचत होत्या
भुतासारख्या भेसूर बातम्या !

शेवटी आली...
एक डाकीण बातमी काळी-

पानशेत धरण धडाडे – पुणें बुडाले!
फुटले खडकवासले...
आकाशात ढगांचे काळे काफिले मोठ्याने हासले!

मी वर पाहिले...
डोक्यावर होता काळा ढग...
हाच तो...
काळतोंड्या, सत्यानाशी ढग!
उचलून मी डोळा, केला कागदाचा चोळामोळा
आणि उन्मत्त पुरुरव्याप्रमाणे
त्या जलधराकडे हिसकून हात म्हटले—
आः! दुरात्मन्...

परंतु नंतर अचानक एकदा
माझ्या खिडकीच्या डोळयातले चमकले रंग!
होते संध्येचे गोरे अंग
वक्षावरून तिचा गेला होता अर्धवट पदर
ढगांचा रंगीबेरंगी...
लाल...गुलाली...पिवळे...नारिंगी...
ढग...

तत्क्षणी मग
विसरलो मी पूरबीर
विसरलो राग, वैर

विसरलो ढगांचा काळा दैत्यदुष्टावा
आणि उद्गारलो...वा वा!
सुंदर ढग!
किती सुंदर ढग...
" या वेळी जर तडाग असतो,..."

इंदूर, २८ जुलै ६१

## तैमूर

कोठे तो तैमूर ?...प्रकटू द्या त्याला !
हाणून हातोडा जो निरुपयोगी
        निर्जीव स्तोमाच्या करील ठिकऱ्या
पूर्वी एकदा जी वाहिली होती विचारगंगा
तीतून वेचून काही तत्त्वगोटे
आंधळे भक्त हे करीत बसले त्यांची नुस्ती पूजा
"सनातन धर्म...सनातन मार्ग..."
मूर्खांनो ! जगात काय "सनातन" (मेलेल्याखेरीज) ?
तुमच्या या चार भिंतींच्या बाहेर
        काय हो राहिले आहे "सनातन" ?
झाले विद्युत्पात, कैकहि भूकम्प,
मोठाले पर्वत झाले कोठे लुप्त (तुम्ही मात्र सुप्त)
प्रवाहांच्या गेल्या बदलून दिशा
        भूमिखंडांच्याहि बदलल्या सीमा
            बदलले जग...

आणि तुम्ही डोळे मिटून बैसला ध्यानस्थ, स्वस्थ
कपटे तुम्हांला केले पराभूत
पुरते लुटला...लुटला...तरीहि
करीत बैसला
दया, क्षमा, शान्ति,
यांची मूर्तिपूजा...

कोठे तो तैमूर ?
प्रकट्ट द्या त्याला...
हाणा रे ! फोडा रे...ही फेकून द्या रे
अगतिक खुळे...
आंधळ्या बुद्धीचे, पांगळ्या वृत्तीचे,
लुळ्या कल्पनांचे, थोट्या कर्तृत्वाचे
रडके पूजक
ओरडतात हे शांतिः, शांतिः, शांतिः...
ओरडू द्या त्यांना...
आम्ही गर्जणार...क्रांतिः ! क्रांतिः ! क्रांतिः !

इंदूर, जानेवारी १९४६

# एकांत

पुसलेल्या पानांचेही ऐकू येती श्वास
ओळखीच्या फुलांचा ये अनोळखी वास

सांजधुळीवरी लाल रंगला आल्हाद
तुझ्या बोलीचाही लागे गुलाबीच स्वाद

टेकडीच्या टोकापाशी उभी आहे रात
नवा नवा तारा आणि नवेलीच वाट

कोऱ्या काळ्या कोरीवरी दिवे रांगोरांग
खूण कुणी अंधाराला केली काय, सांग

तलावाच्या डोळ्यामधे डोहावले शार
उंच गाता गाता मैना गेली रानापार

मातीमधे मातलेली शेते शीत, शांत
कमरेला हातोहाती गुंफला एकांत...

इंदूर, २० नोव्हेंबर १९६०

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
क्रम ३७८५९ वि: ८१०२१
क्रमांक १६५४ नों दि ३।३।६५

## अशुद्ध–शोधन

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४५ | ३ | कतकिच फडत | केतकिचे फेडत |
| ४६ | १ | लिहीन | लिहीत |
| ८७ | २ | लता–पादणी | लता–पादपी |

REFBK-0014064
REFBK-0014064